# जयवंत दळवी यांच्या नाटकांच्या शीर्षकांची समर्पकता

**प्रा. डॉ. आनंद वारके**
मराठी विभाग,
दूधसाखर महाविद्यालय,बिद्री
ता.कागल,जि.कोल्हापूर ४१६२०८

*उद्दिष्ट : जयवंत दळवी यांच्या नाटकांच्या शीर्षकांची समर्पकता शोधणे.*
*व्याप्ती : जयवंत दळवी यांच्या सर्व नाटकांच्या आधारे त्यांच्या नाटकांच्या शीर्षकांची समर्पकता शोधलेली आहे.*

कथानकाला दिलेले शीर्षक समर्पक असावे लागते. त्यातून आशय डोकावला पाहिजे. शीर्षक अकारण लांबलचक असू नये. अखंड साहित्यकृतीचा आशय एखाद्या शब्दात पकडता आला पाहिजे. शीर्षकावरुनही वाचक साहित्यकृतीकडे वळत असतो. विशेषत: नाटकाच्या बाबतीत तर ही गोष्ट फार महत्वाची असते. नाटकाला असलेल्या प्रयोग मूल्यामुळे प्रेक्षकवर्गही नाटकाकडे खेचला पाहिजे असे शीर्षक देणे आवश्यक असते. कथानकाला धरुन येणारी शीर्षके, मुख्य व्यक्तिरेखेचे नाव, काही साहित्यकृतीत लेखक शेवटी पर्याय सुचवत असतो त्याला धरुन शीर्षके येत असतात.

जयवंत दळवी यांच्या नाटकांची शीर्षके काही कथानकाला धरुन, काही व्यक्तिप्रधान, काही नाटकाच्या शेवटी येणारे पर्याय इत्यादी प्रकारानी आली आहेत, त्यांच्या नाटकाची कथानके आणि दळवींनी त्यांना दिलेली शीर्षके संयुक्तिक आहेत का? याचा विचार येथे करत आहे.

दळवी कथा, कादंबरी लेखनानंतर नाटकांच्या लेखनाकडे वळलेले आहेत. आपण नाटककार होऊ असे त्यांना वाटत नव्हते. गं. पां. परचुरे हे प्रकाशक एकदा त्यांच्याकडे नाटक लिहून मागण्यास आले. तेव्हा मंगेश पाडगावकरांनी आपल्याला कधी नाटक लिहिता येणार नाही असे भविष्य सांगितल्याचे त्यांनी पुरचुरे यांना सांगितले. मग परचुरे शुक्ल नावाच्या भविष्यकाराकडे गेले तेव्हा त्यांनी जयवंत दळवी हे चांगले नाटककार होतील असे भविष्य सांगितले. त्यांनी 'स' हे पहिले अक्षर घेऊन दळवींनी नाटक लिहावे असे सांगितले. त्यामुळे दळवींनी 'स' हे आद्याक्षर असणा—या आपल्याच 'सभ्य गृहस्थ हो!' या कथेवर 'सभ्य गृहस्थ हो!' नावाचे नाटक लिहिले. म्हणूनच की काय दळवींच्या ब—याच नाटकाची शीर्षके 'स' वरून तयार झाली आहेत. दळवींचा भविष्यावर किती विश्वास होता नव्हता ही बाब सोडली तरी 'सभ्य गृहस्थ हो!', 'संध्याछाया','सूर्यास्त', 'सावित्री', 'स्पर्श', 'संसारगाथा' इत्यादी शीर्षकाद्वारे वरील मत लक्षात येते.

मुख्य कथानकाला धरून आलेली शीर्षके :

'सभ्य गृहस्थ हो!', 'संध्याछाया', 'सूर्यास्त', 'महासागर', 'पुरुष', 'हरि अप् हरी!', 'कालचक्र', 'नातीगोती', 'स्पर्श', 'लग्न', 'अपूर्णांक' व 'संसारगाथा' ही शीर्षके त्या त्या नाटकाच्या आशयाला धरून आली आहेत.

'सभ्य गृहस्थ हो!' हे संबोधनात्मक शीर्षक आहे. या नाटकात ज्या लाऊड स्पिकरचा दळवींनी एखाद्या व्यक्तिचित्रासारखा जो वापर करून घेतला आहे .त्या लाऊड स्पिकरच्या तोंडी हा शब्द आहे. सभ्यपणाचा आव आणणा—या असभ्य वर्तन करणाया व्यक्तिसाठी तो वापरला आहे. हे नाटक अनेक व्यक्तिरेखांच्या आधारे हलक्या फुलक्या विनोदासाठी लिहिले आहे. शिवाय दळवींच्या नाटकाच्या लेखनातील स्त्री पुरुष संबंध हा विषयही त्यामध्ये आहे. समाजाने सभ्य मानलेले लोक मध्यमवयात परस्त्रीकडे लैंगिक आकर्षणाच्यादृष्टीने पाहतात. नाटकाच्या उभारणीत सर्व व्यक्तिरेखांचा सहभाग महत्वाचा वाटतो. सभ्य गृहस्थ असभ्य वर्तन करतात म्हणून उपरोधिक भाषेत 'सभ्य गृहस्थ हो!' हे शीर्षक दळवींनी वापरले आहे. त्यामुळे ते योग्य वाटते.

'संध्याछाया' या नाटकात त्यांनी उतारवयातील व्यक्तींचा एकाकीपणा चित्रित केला आहे. आयुष्याच्या सरत्या काळात आपल्या मुलांनी वृद्ध आईवडिलांचा सांभाळ करावा असे भारतीय संस्कृती सांगते. बदललेल्या काळात सुशिक्षित पिढीकडून ही मूल्ये विसरली जातात. या काळात येणारा थकवा, भ्रमिष्टपणा, अपेक्षा व अपेक्षाभंग, हवा असणारा आधार, एकाकीपणा यातून निर्माण होणारा भेसूरपणा दळवींनी योग्य पद्धतीने रेखाटला आहे. तो या शीर्षकातून व्यक्त होतो. नाटकाचा विषय समजतो. हे एक समर्पक शीर्षक दळवींनी या नाटकास योजले आहे असे वाटते.

'सूर्यास्त' हे शीर्षकही अर्थपूर्ण आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या काळात वाढत चाललेला भ्रष्टाचार व मानवी मूल्यांचा —हास हा या नाटकाचा विषय आहे. भ्रष्टाचार व मानवी मूल्यांचा —हास थांबावा, यासाठी एक गांधीवादी धडपडतो पण सत्ताधिशामुळे त्याला मृत्यूला सामोरे जावे लागते. आपला भ्रष्टाचार काढणा—या बापालाही नेस्तनाबूत करणारा मुलगा आणि मुलाचा भ्रष्टाचार काढणारा बाप यांच्यातील हा संघर्ष आहे. ध्येयवादी बापाची बेदरकारपणे झालेली हत्या, भ्रष्टाचार व मूल्य—हास थांबविण्यासाठी त्यांनी निर्भिडपणे केलेले प्रयत्न ही या नाटकातील उल्लेखनीय बाब आहे. सूर्य ज्याप्रमाणे तेजाने तळपतो व त्याचा अस्त होतो तसे या नाटकातील आप्पाजीही निर्भिडपणे लढतात व त्यांचा अंत होतो. यासाठी दळवींनी हे शीर्षक वापरले आहे. अगदी उतारवयातही उमेद न गमावता, मोठ्या धाडसाने, निर्भिडपणे आपल्या मुलाची व त्याच्या साथीदारांची कृष्णकृत्ये वेशीवर टांगणा—या बापाचा आवाज दडपला जातो. ही हत्या खरोखरच आपल्या तेजाने तळपणाच्या सूर्याचा अस्त आहे. म्हणूनच दळवींनी या नाटकाला दिलेले शीर्षक योग्य आहे.

मानवी मनासंबंधी दळवींनी 'महासागर' हे शीर्षक वापरले आहे. माणसाचे मन अथांग आहे. त्याचा तळ लागत नाही हे दळवींनी या नाटकात वेगवेगळया स्वभाववैचित्र्याची माणसे घेऊन सांगितले आहे. आपल्याला मुलगा हवा म्हणून चिडचिड चिडणारी स्त्री, नव—याचे जीवापाड प्रेम असतानाही परपुरुषाबरोबर शरीरसुख घेणारी स्त्री, आर्थिक ओढघस्तीत आपल्या मैत्रिणीच्या संसारात व तिच्यामध्ये रस घेणारा पुरुष, व्यभिचारी स्त्रीचा सहनशील नवरा, आपल्याकडे लग्न करण्यासाठी हवे असणारे टेंपरामेंट नाही असे म्हणणारा, तरीही अन्य स्त्रियांशी संबंध ठेवणारा पुरुष, याउलट एखादा साधा माणूसही दोन लग्न करतो. लग्न झाल्याबरोबर पती वारला असतानाही शांत असणारी स्त्री, प्रेमभंगानंतरही सुंदर बायको मिळाली असती पण प्रेमभंगाने वेडसर झालेला तरुण अशा प्रत्येकाच्या वागण्याच्या वेगवेगळया त—हा आहेत. ही माणसे अशी का वागतात याचा शोध दळवींनी या नाटकातून घेतला आहे. प्रत्येकाचे मन महासागरासारखे असते. म्हणून दळवींनी या नाटकास वापरलेले शीर्षक योग्य आहे.

नाटकाचा संपूर्ण आशय डोकावणारे त्यांचे आणखी एक शीर्षक म्हणजे 'पुरुष' हा शब्दच मुळी पुरुषाची शक्ती, त्याला निसर्गाने बहाल केलेले इंद्रिय या बाबी सुचविते. या नाटकातील स्त्रीवर होणारा अन्याय हा पुरुषी संस्कृतीकडून होणारा अन्याय आहे. ज्या स्त्रीवर हा अन्याय होतो ती नव्या युगातील ध्येयवादी, जिद्दी तरुणी आहे. आपल्या ध्येयापोटीच ती राजकारणी व्यक्तीच्या अत्याचाराला बळी पडते. न्यायालयातही तिला न्याय मिळत नाही. पुरुष वकीलही तिला निरुत्तर करतो. तिच्याशी आंतरजातीय लग्न करायला तयार असणारा तरुणही तिच्यापासून दूर होतो. आपल्यावर होणा—या अत्याचाराचा बदला घ्यायचा ती प्रयत्न करते. तेव्हाही तिला पुरुषाचीच मदत घ्यावी लागते. काळ कितीही बदलला तरी स्त्रीचे अबलापण संपत नाही. पुरुषाची प्रवृत्ती, त्याचा नराधमपणा, पशुपातळी वाढतच चालल्याचे दळवींनी या नाटकाद्वारे सांगितले आहे. म्हणून 'पुरुष' हे या नाटकाचे शीर्षक उचित असे आहे.

उदय, विकास आणि लय या चक्रात सृष्टीतील प्रत्येक वस्तू निर्माण होत असते. मानवी जीवनही त्याला अपवाद नाही. तरुणपणी याचा कधी विचार केला जात नाही. वृद्धावस्थेत गेल्यावर मदतीची अपेक्षा भासते. अशा वृद्धाकडे तरुण दुर्लक्ष करतात. आपणही एकदा म्हातारे होणार आहोत. आपणही अशीच अपेक्षा करू हे तरुणांना समजत नाही. वय, शक्ती व प्रवृत्ती यामुळे असे होत असते. त्यामुळे वृद्धांना जीवन असह्य होते. प्रत्येकाला त्या अवस्थेतून जावे लागणार असते. हे 'कालचक्र' आहे. सृष्टीतील हे चक्र उलगडून दाखविण्यात दळवी यशस्वी झाले आहेत. त्यामुळे या नाटकास दिलेले 'कालचक्र' हे शीर्षक योग्य असे आहे.

मानवी जीवनामध्ये रक्ताची, मानलेली अशी नाती असतात. अशा नातेसंबंधाचे वर्णन दळवींनी आपल्या 'नातीगोती' या नाटकात केले आहे. आपल्या मतिमंद मुलासाठी जिवाचा आटापिटा करून घेणारा बाप, त्याचा सर्व त्रास सोसणारी आई या नाते संबंधातून उभा राहाणारे एक कारूण्य दळवींनी या नाटकात रेखाटले आहे. म्हणून या नाटकाला दिलेले 'नातीगोती' हे शीर्षक संयुक्तिक वाटते.

दळवींच्या 'अपूर्णांक' या नाटकाचे हे शीर्षक एक गणिती संज्ञा आहे. यातील छेदामुळे भागाकार होऊन बाकी उरते. कितीही भागले तरी बाकी ही उरतेच. ही संज्ञा दळवींनी स्त्री पुरुष संबंधासाठी वापरली आहे. स्त्री पुरुष संबंध मैत्रीचे असोत किंवा विवाहानंतरचे असोत प्रत्येकाचा एकमेकामधील इंटरेस्ट संपत असतो. दुस—यात रस वाटू लागतो केवळ पुरूषानेच नव्हे तर स्त्रीनेही आपल्या मनाला कितीही मुरड घातली तरी हे अशक्य आहे. लैंगिकतेबद्दलची घृणा निर्माण झालेली एक साधारण मध्यमवयीन स्त्री सुध्दा या विषयापासून स्वतरूला दूर ठेवू शकत नाही. लैंगिक संबंधाची इच्छा स्वाभाविक आहे. तिचे दमन होऊ शकत नाही. निसर्ग नियमाप्रमाणे स्त्री पुरूषांनी राहिले पाहिजे. या विषयापासून दूर राहू शकणा—या स्त्री पुरूषांच्या

मनातही ही अपूर्णता दिसून येते. लैंगिकतेची घृणा असलेल्या एका मध्यमवयीन स्त्रीच्या जीवनात आलेल्या दोन पुरुषापैकी कोणाची मैत्री श्रेष्ठ? विवाहित असून या स्त्रीकडे चोरुन येणा—या व्यक्तीची की विवाहित असून उघड उघड या स्त्रीला मदत करणा—या व्यक्तीची मैत्री श्रेष्ठ? स्त्री पुरूष विवाहित असोत अथवा अविवाहीत या संबंधात एक प्रकारचा अपुरेपणा जाणवतो. यासाठी दळवींनी या नाटकाला दिलेले 'अपूर्णांक हे शीर्षक योग्य आहे. कुरूप मुलीच्या लग्नाची चिंता, तिचे अनैतिक संबंध, त्यातून उद्‌भवलेला तिच्या गरोदरपणाचा प्रश्न, घरचे दारिद्रय, लैंगिक अतृप्ती, कुरूपता, सौंदर्य, राजकीय व्यक्तींचा दबाव इत्यादी बाबींमुळे एका कुटुंबात निर्माण झालेले उदासिनतेचे वातावरण दळवींनी 'संसारगाथा' या नाटकात रेखाटले आहे. या ताणतणावामुळे कुटुंबात हास्य असे फुलतच नाही. संसार, कुटुंब, कुटुंबाची परवड यासाठी दळवींनी या नाटकाला दिलेले 'संसारगाथा' हे शीर्षक समर्पक असे आहे. दळवींनी दिलेल्या या शीर्षकातून नाटकाचा आशय आणि विषय डोकावताना दिसतो. त्यांच्या 'लग्न' या नाटकाच्या शीर्षकातूनही आशय व्यक्त होतो. विवाहानंतर पती पत्नीमध्ये लैंगिक संबंधातून कटूता निर्माण झाली तरी हा गैरसमज दूर झाल्यामुळे, थोडीसी तडजोड केल्यावर ती एकत्र येऊन संसार करू शकतात. त्यासाठी विवाहाची गरज आहे. भारतीय संस्कृतीतील ती एक महत्त्वाची आणि चांगली बाब आहे. ती टिकविणे समाजाच्या हिताचे आहे. विवाह केवळ शरीर सुखासाठीच म्हणून विवाह बाह्य लैंगिक संबंध निर्माण केले तर अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. समाजाने विवाहानंतर त्याच लैंगिक संबंधाना मान्यता दिल्यामुळे लग्न ही समाजातील, भारतीय संस्कृतीतील महत्वाची संस्था असून तिची गरज समाजाला असल्याचे दळवींनी या नाटकाच्या आधारे सांगितले आहे. त्यामुळे हे शीर्षकही योग्य आहे.

सागरामध्ये भरकटत गेलेले जहाज कधी ना कधी किना—याला येत असते. किनारा हाच त्याचा आधार असतो. जीवनामध्येही अनेक बाबींमुळे भरकटत गेलेल्या पुरूषास शेवटी कुटुंबाच्या आधाराला यावे लागते. कुटुंब या अर्थाने दळवींनी किनारा असा शब्द वापरला आहे. कष्टाशिवाय हाती आलेल्या पैशामुळे आणि पत्नीतील इंटरेस्ट संपल्यामुळे बाहेरख्याली बनलेल्या व्यक्तीस आजारी पडल्यावर तरी कुटुंबाचा आधार घ्यावा लागतो. हे सांगण्यासाठी दळवींनी वापरलेले हे शीर्षक योग्य आहे. 'किनारा' हे प्रतिकात्मक शीर्षक आहे.

एका भरल्या कुटुंबातील सर्वांच्या मायेच्या स्त्रीला रोग झाल्यावर तिचा स्पर्श टाळला जात, त्यातून निर्माण झालेले कारूण्य 'स्पर्श' या नाटकात दळवींनी मांडले आहे. हे शीर्षक आशय व्यक्त करणारे आहे. रोगामुळे समाज व कुटुंबातील व्यक्तीकडून होणारी तिची परवड या नाटकात मांडल्यामुळे या शीर्षकाला एक परिमाण प्राप्त झाले आहे. दळवींच्या 'हरि अप हरी!' या नाटकाचे हे शीर्षक इंग्रजी शब्दाच्या सहाय्याने बनलेले आहे.

भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या काळात वाढत चाललेला भ्रष्टाचार दळवींनी या नाटकात विनोदी पद्धतीने मांडला आहे. भ्रष्टाचार दूर करायला जाणा—यालाच भ्रष्टाचारात गुंतवले जाते. भ्रष्टाचार व भ्रष्टाचारी कमी होत नाहीत. हा अधर्म नाहीसा करण्यासाठी या नाटकातील श्रीकृष्णास महाभारतकालीन जगात अधर्म वाढत चालल्यावर परत जन्म घेईन असे म्हणणा—या कृष्णाचा धावा करावा लागतो. नाटक विनोदी उपहासपूर्ण असल्यामुळे शीर्षकाची रचनाही 'हरि अप हरी!' अशी केली आहे.

**व्यक्तिवाचक शीर्षके :**

जयवंत दळवी यांनी आपल्या 'बॅरिस्टर', 'दुर्गी', 'सावित्री', 'मुक्ता' व 'राष्ट्रपती' या नाटकांना व्यक्तिवाचक शीर्षके दिली आहेत.

'बॅरिस्टर' या नाटकातून दळवींनी मनोविकृतीचा शोध घेतला आहे. माणसाच्या मनावर होणा—या आघातामुळे तो विक्षिप्त वागू लागतो. त्याची वाटचाल वेडसरपणाकडे होत असते. अशा एका संवेदनशील व्यक्तीच्या मनोविकृतीचा शोध दळवींनी या नाटकाद्वारे घेतला आहे. म्हणून दळवींनी या नाटकास दिलेले व्यक्तिवाचक शीर्षक योग्य वाटते. त्यांच्या 'दुर्गी' या नाटकांच्या शीर्षकात मात्र विसंगती आहे. कारण नाटकास नाव 'दुर्गी' असे असल्यामुळे नाटकात तिच्याविषयी ब—या वाईट बाबी वाचायला मिळतील अशी अपेक्षा मनात निर्माण होते. प्रत्यक्ष वाचनानंतर मात्र निराशा होते. हे नाटक 'दुर्गी' शी कंपॅनियनशीप जोडणा—या वृध्द बाबूरावांचे वाटते. ही कंपॅनियनशीप बाबूरावांना हवी आहे. आपल्या एकाकीपणात कंपॅनियनशीप म्हणून एखादी स्त्री असावी असा विचार त्यांच्याच मनात अगोदर येतो. त्यासाठी ब—याच कृती त्यांच्याकडूनच सुरू होतात. म्हणून या नाटकाच्या शीर्षकात विसंगती वाटते. या बाबत सुरूचि म्हणतात,''या नाटकाचे नाव फसवे आहे. नायकाच्या नायिकेचे नाव देऊन त्यांनी अपेक्षा निर्माण केली की, दुर्गीच्या जीवनातील चढउतार बारकावे, पेचप्रसंग वगैरेचे दर्शन इथे घडणार, प्रत्यक्षात एक मसाल्याची कोळंबी करण्यापलीकडे ती सुध्दा दुर्गीने नव्हे तर तिच्या आईनेच केली किंवा त्याचा मसाला वाटण्या पलीकडे दुर्गी काहीच वाटत नाही. तिच्या

आयुष्याचे जे भलेबुरे झाले त्याचे फक्त निवेदन व तेहि इतर पात्रांच्या तोंडून ऐकायला मिळते. त्या सर्व प्रसंगात दुर्गीची मनोवस्था काय होती, तिचा सहभाग किती होता. नव—याऐवजी सास—या बरोबर वागता वावरताना तिचे काय हाल झाले. याचा मागमूसही इथे नाही.''१ शिवाय डॉ. वि. भा. देशपांडे यांचे एक मतही या नाटकाच्या शीर्षकाची योग्यता ठरविण्यास उपयोगी पडेल. ते म्हणतात,''नाटकाचे नाव व्यक्तिवाचक असल्यामुळे नाटक व्यक्तिकेंद्री असल्यासारखे वाटते पण वस्तुत: तसे नाही. नाटक अन्य व्यक्तिचेही असते. त्यामुळे नाटकाच्या नावात अपूर्णता वाटते.''२ तेव्हा बारकाईने विचार केल्यास या नाटकाच्या शीर्षकात असणारी विसंगती जाणवल्याशिवाय राहात नाही.

'सावित्री' हे या नाटकास दिलेले शीर्षक यथार्थ आहे. या नाटकात करिअर करू पाहणा—या स्त्रीची समस्या दळवींनी मांडली आहे. ही स्त्री नव्या युगातील आहे. तिच्या जीवनात येणाध्या अनेक समस्यामुळे तिची परवड सुरू होते. त्यांना सामोरे जाण्यासाठी ती काही खंबीर निर्णय घेते. प्रत्येक बाब तिला अडचणीत आणते. नोकरीत तिला प्रमोशन मिळते म्हणून तिच्या नव—या ला तिच्या चारित्र्याचा संशय येतो. म्हणून तो घर सोडून जातो. पुरूषाशिवाय स्त्रीला एकटे राहाणे कठीण असते म्हणून ती आपल्या बॉसला घरी ठेवून घेते. त्यांच्याकडून गरोदर राहाते तेव्हा तोही निघून जातो. मनाविरूध्द तिला अबॉर्शन करावे लागते. नोकरी करणे तिला अवघड जाते. म्हणून ती नोकरी सोडून देते. या सगळया आघातातून सावरून पुन्हा नोकरी करायचे ठरविते तर सगळेजण तिच्याकडे रखेली म्हणून पाहतात. अशी तिची परवड होते. ही एका स्त्री जीवनाची परवड असल्यामुळे नाटकास या स्त्रीचे नाव दिले आहे ते योग्य आहे.

'राष्ट्रपती' हे ही नाटकाचे व्यक्तिवाचक शीर्षक आहे. या शीर्षकावरुन नाटकाचा विषय व आशय लक्षात येतो. सर्व सत्ता एकट्यच्या हाती एकवटू पाहणा—या व्यक्तीचा निर्देश होतो. पैशाच्या जोरावर काहीही करता येते, जमीन हडप, भ्रष्टाचार, काळे धंदे, स्त्रीवर अत्याचार यासाठी पैशाच्या जोरावर सत्ता विकत घेऊ पाहणारी महत्त्वाकांक्षी व्यक्ती या नाटकात भेटते. नाटकाचा विषय वास्तववादी आहे. पैशाने खासदार विकत घेऊन राष्ट्रपती होऊन देश आपल्या ताब्यात ठेवू पाहणा—या व्यक्तींसाठी दळवींनी हे जे शीर्षक वापरले आहे ते उचित आहे.

अशा प्रकारे दळवींनी आपल्या नाटकांना व्यक्तिवाचक शीर्षके दिली आहेत. 'दुर्गी' या नाटकाचा अपवाद वगळता ती समर्पक आहे.

नाटकाच्या कथानकाच्या अखेरीस धरुन आलेले शीर्षक :

दळवींनी आशयाला धरुन, मुख्य व्यक्तिरेखेला धरुन आपल्या नाटकांना शीर्षके दिली आहेत, त्याचबरोबर त्यांनी 'पर्याय' हे या नाटकाच्या अखेरीस धरुन शीर्षक दिले आहे. या नाटकात दळवींनी जी समस्या मांडली आहे त्यावर त्यांनी अखेरीस त्यांच्या परीने पर्याय सुचविला आहे. त्यालाच त्यांनी 'पर्याय' असे म्हटले आहे. या नाटकात दळवींनी समाजातील हुंडाबळीसारखी बाईट प्रथा रेखाटली आहे. पैसा, संपत्ती, ऐश्वर्याच्या मोहासाठी निष्पाप जीव मारले जातात यामुळे दळवी व्यथीत होतात. अशा समस्येवर ते एखादा उपाय सुचवू पाहतात. बळी गेलेल्याना न्यायालयात न्याय मिळेल आणि अपराध्याना शिक्षा होईलच असे नाही, समाजानेच त्यांना शिक्षा ठोठावली पाहिजे. तरच असा गुन्हा करणायावर थोडी जरब बसू शकेल. म्हणून दळवींनी या नाटकात हुंडा घेणा—या नव—याची गाढवावरून धींड काढणे, सामाजिक बहिष्कार टाकणे असा उपाय सुचविला आहे. यामध्ये तरुण मंडळांचा सहभाग असावा असे म्हटले आहे. अशा समस्यावर अनेक पर्याय असू शकतील पण दळवींना म्हणून जो योग्य वाटला तो त्यांनी सांगितला आहे. म्हणून त्यांनी या नाटकास 'पर्याय' असे जे नाव दिले आहे ते योग्य आहे.

**इतर शीर्षके :**

'मालवणी सौभद्र' हे आणखी एका नाटकाचे शीर्षक. हे 'संगीत सौभद्र' अण्णासाहेब किर्लोस्करांचे नाटक कोकणातील नाटक मंडळी प्रयोगरुपाने सादर करताना होणारे विडंबन दळवींनी या नाटकात मांडले आहे. ते मालवणी भाषेत असल्यामुळे त्यास दिलेले शीर्षक योग्य आहे.

**निष्कर्ष :**

१. दळवींनी नाटकातील आशयाला, प्रमुख व्यक्तिरेखेला, अखेरीस धरून योजलेली शीषके समर्पक आहेत.

२.'संध्याछाया','सूर्यास्त','पुरुष'व'स्पर्श' ही लक्षवेधी शीर्षके आहेत.

३.'दुर्गी'या नाटकाचा अपवाद वगळता दळवींच्या कोणत्याही नाटकाच्या शीर्षकात विसंगती नाही.'दुर्गी' असे या नाटकाचे शीर्षक असले तरी हे नाटक 'बाबूराव' या व्यक्तीचे असल्यामुळे या नाटकाचे शीर्षक यथार्थ नाही.

**संदर्भ:**

१) सुरूचि,'दुर्गी : समर्थ अभिनय तरी कमकुवत', रंगमंच, 'केसरी', २१मे,८०,पृ.४

२) देशपांडे वि.भा.,'जयवंत दळवी यांचे नवे नाटक', 'दुर्गी', मंथन, सोबत,८मे १९८०,पृ.३